# नागपूर महानगरपालिका, नागपूर

**(जनसंपर्क विभाग)**

**प्रसिद्धी पत्रक** **दि. १ डिसेंबर २०१९**

# पाच कोटींच्या महापौर निधीतून शहरभरात सार्वजनिक शौचालये

## ‘ब्रेकफास्ट विथ मेयर’ कार्यक्रमात महापौर संदीप जोशी यांची ग्वाही

**नागपूर, ता. १ :** नागपूर शहरात सार्वजनिक शौचालय आणि प्रसाधनगृहे अत्यंत कमी आहेत. जी आहेत त्यांची अवस्था वाईट आहे. महिलांचीही यामुळे कुचंबना होते. याची गांभीर्याने दखल घेत महापौर संदीप जोशी यांनी महापौरांचा संपूर्ण पाच कोटींचा निधी मोक्याच्या जागी आणि बाजारांमध्ये सार्वजनिक सुलभ शौचालये उभारण्यासाठी वापरण्यात येईल, अशी ग्वाही महापौर संदीप जोशी यांनी स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींसमोर दिली.

शहर विकासात लोकसहभाग आवश्यक आहे. म्हणूनच नागरिकांच्या सूचना, संकल्पना जाणून घेण्यासाठी महापौर संदीप जोशी यांनी शहरातील विविध २०० स्वयंसेवी संस्थांना ‘ब्रेकफास्ट विथ मेयर’ या

उपक्रमाच्या माध्यमातून आमंत्रित केले होते. सिव्हील लाईन येथील मनपा मुख्यालयाच्या हिरवळीवर रविवारी (ता. १) सकाळी आयोजित कार्यक्रमात नागरिकांच्या सूचना आणि तक्रारी ऐकून घेतल्यानंतर महापौर संदीप जोशी बोलत होते.

यावेळी महापौर संदीप जोशी यांच्यासह उपमहापौर मनीषा कोठे, आयुक्त अभिजीत बांगर, सत्तापक्ष उपनेते बाल्या बोरकर, वर्षा ठाकरे, ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी, सुनील अग्रवाल, प्रतोद दिव्या धुरडे, आरोग्य सभापती वीरेंद्र कुकरेजा, नगरसेवक निशांत गांधी, नगरसेविका चेतना टांक, भारती बुंदे, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, पोलिस विभाग वाहतूक शाखेचे जयेश भांडारकर उपस्थित होते.

‘ब्रेकफास्ट विथ मेयर’ उपक्रमात विविध स्वयंसेवी संस्थाचे सुमारे ३०० च्या वर प्रतिनिधी सहभागी झाले होते. प्रारंभी महापौर संदीप जोशी यांनी उपक्रमामागील संकल्पना विषद केली. नगरविकासात लोकसहभाग ह्यावर आपला भर असून यासाठी ‘वॉक ॲण्ड टॉक विथ मेयर’, झोननिहाय बैठका आणि ‘ब्रेकफास्ट विथ मेयर’ अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांच्या सूचना ऐकून घेत आहोत. शहरात सुमारे १०० ठिकाणी सूचना पेटी लावण्यात आल्या असून त्यामाध्यमातूनही लोकांच्या सूचना मागविण्यात आल्या आहे. संपूर्ण शहरातील लोकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी ‘तक्रार निवारण शिबिरा’चे आयोजन १२ डिसेंबर रोजी करण्यात आले आहे. लोकांनी दिलेल्या सूचनांच्या आधारावर शहर विकासाची ‘ब्ल्यू प्रिंट’ तयार करण्यात येईल आणि त्यादृष्टीने शहराचा विकास करण्यात येईल, असे महापौर संदीप जोशी यांनी सांगितले.

यानंतर उपस्थिती स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींनी शहर विकासाच्या संकल्पना आणि सूचना मांडल्या आणि लेखी स्वरूपातही दिल्या. रामदासपेठ प्लॉट ओनर्स असोशिएशनचे हरजितसिंग बग्गा यांनी बेवारस कुत्र्यांच्या समस्येवर उपाय करण्याची विनंती केली. ग्रीन व्हिजील फाऊंडेशनचे कौस्तभ चॅटर्जी यांनी झाडांवर जाहिरातील लावून होत असलेल्या शहराचया विद्रुपीकरणाचा मुद्दा प्रकर्षाने मांडला. स्वयंपाकघर आणि बाथरूममधून निघणारे 'ग्रे वॉटर'वर प्रक्रिया करणे बंधनकारक करण्याची सूचना मांडली. टॉयलेटमध्येही फ्लशचा उपयोग न करण्यावर बंधन घातले तर दररोजचे ३० लीटर पाणी वाचू शकेल, अशी सूचना मांडली. भांडेवाडी येथे उन्हाळ्यात लागणाऱ्या आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी सिवेज ट्रीटमेंट प्लॉन्ट मधील पाण्याचा वापर करण्याची सूचना मांडली.

शहरातील सार्वजनिक सुलभ शौचालायाचा मुद्दा उपस्थितांनी प्रकर्षाने मांडला. यासोबतच फुटपाथवरील अतिक्रमण आणि तुटलेले फुटपाथ याबाबतही मनपाने गंभीर भूमिका घेण्याची सूचना नागरिकांनी मांडली. कॅग ग्रुपचे विवेक रानडे यांनी रात्री घरासमोरील लहान रस्त्यांवर करण्यात येणाऱ्या कार पार्किंगची समस्या मांडली. रात्री २ ते सकाळी ६ या वेळेत अशा गाड्या उभ्या असतील तर त्यावर दंड करण्याची सूचना केली. यामुळे सफाई कर्मचाऱ्यांना स्वच्छतेत अडथळा निर्माण होत असल्याचे सांगितले. जनमंचचे शरद पाटील, जेसीआयचे माणिक ढोणे, अ.भा ग्राहक पंचायतचे गजानन पांडे, विदर्भ टॅक्सपेयर्स असोशिएशनचे जे.पी. शर्मा, डॉ. प्रतिमा शास्त्री, जैन स्पोर्ट फाऊंडेशनचे अतुल दुरुगकर, रा.पै. समर्थ स्मारक समितीचे स्वप्नील समर्थ, तरुण भारतीय, जनमंचचे

राम आकरे, सिविक ॲक्शन फाऊंडेशनचे गिरीश वझलवार, जनआक्रोशचे सचिव रवी कासखेडीकर, इंडिपेंडंट स्कूल असोशिएशनचे अतुलेश लाचोरे, समर्पण सेवा समिती आणि लॉयन्स क्लबचे नरेश जुमानी, रेसिडेंशियल हॉटेल असोशिएशनचे अध्यक्ष तेजिंदरसिंह रेणू, व्यापारी असोशिएशनचे सुभाष अग्रवाल, हेमंत गांधी, नागविदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष अश्विन मेहाडिया, भारतीय स्वर्णकार समाजाचे सचिव अरविंद हाडे, जलसंसाधन संस्थेचे संजय वानखेडे, नागपूर फर्स्टचे दिनेश जैन, साहस व्यसनमुक्ती केंद्राचे विजय शेंडे, हेमंत लोढा, निसर्ग विज्ञान मंडळाचे विजय घुगे, वनराई फाऊंडेशनचे अजय पाटील, डॉ. पिनाक दंदे, केळीबाग रोड व्यापारी असोशिएशनचे रोशन जावळा, मंगला देशकर, जागनाथ बुधवारी व्यापारी असोशिएशनचे रितेश मोदी, पोहा-मुरमुरा मर्चंट असोशिएशनचे गेंदलाल साहू, पंतजली योग समितीच्या शोभा भागीया, राकेश मोटवानी, सारथी ट्रस्टच्या विद्या कामडे आदींनी शहर विकासासंदर्भात विविध सूचना मांडत मनपासोबत खांद्याला खांदा लावून कार्य करण्याची तयारी दर्शविली.

महापौर संदीप जोशी यांनी नागरिकांनी मांडलेल्या सूचनांची दखल घेत असल्याचे सांगितले. फुटपाथसंदर्भात शुक्रवारीच बैठक झाली असून सहा कोटींचा निधी तातडीने उपलब्ध करून देण्यात येत आहे. फुटपाथ अतिक्रमणासंदर्भात विशेष मोहीम आखण्यात येत आहे. सुलभ शौचालयांसमोर आता व्यवस्थापन करणाऱ्यांचे क्रमांक लावण्यात येणार आहे. अव्यवस्था असेल, घाण असेल तर एकदा नागरिक म्हणून संबंधिताला जाब विचारा. नाही ऐकले तर मनपा प्रशासनाला कळवा. त्याचे कंत्राट रद्द करण्यात येईल. पेट्रोल पंप मालकांची ६ डिसेंबरला बैठक

घेण्यात येत असून शहरातील सर्व पेट्रोल पंपवरील प्रसाधनगृह तातडीने महिला व नागरिकांसाठी सुरु करण्याची विनंती करण्यात येईल. जेणेकरून किमान १०० ठिकाणी प्रसाधनाची व्यवस्था होईल. लवकरच एका टोल फ्री क्रमांकाची व्यवस्था करण्यात येईल. चौक सौंदर्यीकरणासाठीही एक कार्यक्रम आखण्यात येईल. नगरसेवक आपली जबाबदारी पार पाडत असतात. प्रशासनही नागरिकांना सेवा देण्यासाठी दिवसरात्र राबत असते. नागरिक म्हणून आता आपणही शहर विकासात सोबत या, असे आवाहन महापौर संदीप जोशी यांनी यावेळी केले.

आयुक्त अभिजीत बांगर म्हणाले, प्रत्येक तक्रारी आणि सूचनांवर आम्ही कार्य करीत आहोत. कार्य करताना कुठे कायद्याच्या चौकटीत राहून कार्य करावे लागते. परंतु शहरविकासासाठी आणि नागरिकांना चांगल्या सेवा देण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नरत असतो. आरोग्य आणि शिक्षणाबद्दलच्या आलेल्या सूचना स्वागतार्ह असून लवकरच मनपाची सीबीएसई शाळा सुरू करण्यात येईल, असा विश्वास त्यांनी दिला. आपण प्रत्येकाने चांगल्या गोष्टीची सुरुवात स्वत:पासून केली तर हे शहर शिस्तीत आणि स्वच्छतेत क्रमांक एक असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**एक मार्चला पुन्हा भेटू..!**

केवळ दिखावा म्हणून हे आम्ही करीत नाही तर खरोखरच विकासाची नवी संकल्पना लोकसहभागातून रूढ करू इच्छितो. आपल्या सूचनांच्या आधारे आखलेल्या कार्यक्रमाचा आपण १ मार्चला आढावा घेऊ, असा विश्वास महापौर संदीप जोशी यांनी यावेळी उपस्थितांना दिला.

**नागरिकांनी मांडलेल्या ठळक सूचना**

-घरासमोरील कार पार्किंगवर निर्बंध

-प्रत्येक घरमालकाने त्यांच्या घरासमोरील १० फूट जागा स्वच्छतेसाठी दत्तक घ्यावी.

- गाईंचे आणि म्हशींच्या वाया जाणाऱ्या शेणापासून खतनिर्मिती करावी

- विद्यार्थिंनीच्या शोषणाविरोधात कार्य करण्यासाठी मनपाच्या पुढाकारातून व्हिजीलन्स कमिटी नेमावी.

- दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र उद्यान तयार करावे. विशेष इंटरनेट कॅफेही असावेत.

- मैदानांवर आयोजित स्पर्धा कुठल्याही सभांमुळे वेळेवर रद्द करण्यात येऊ नयेत.

- असे संवाद कार्यक्रम नगरसेवकांच्या उपस्थितीत प्रत्येक प्रभागात व्हावेत.

- प्रत्येक वाहतूक सिग्नल असलेल्या चौकात झेब्रा क्रॉसींग, स्टॉप लाईन स्पष्ट असाव्यात. यामुळे चौकाचे सौंदर्यही खुलते.

- पार्किंग प्लाझा सुसज्ज असावेत.

- सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढण्यासाठी मेट्रो कॉरिडोअरमधील पार्किंगच्या जागा हटवाव्यात किंवा दूर न्याव्यात.

- मध्य नागपूरमधील फुटपाथवर असलेले ऑटोडिल व्यावसायिकांचे अतिक्रमण हटवावे.

-रा. पै. समर्थ यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून रा.पै.समर्थ चिटणीस पार्कचे सौंदर्यीकरण करण्यात यावे.

- शहरातील जलस्त्रोतांचे संरक्षण व्हावे.

- हॉकर्ससाठी पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

- गांधीसागरलगतची खाऊ गल्ली सुरू करावी.

- बंद वाहतूक सिग्नलची माहिती आणि योग्य संचलनासाठी 'विशेष ॲप' तयार करावे.

- पानठेल्यांची संख्या कमी करण्यात यावी.

- बंद पडलेल्या शाळांचे वाचनालयात रूपांतर करावे आणि जुन्या वाचनालयांना अत्याधुनिक करावे.

- तृतीय पंथियांसाठी स्वतंत्र सार्वजनिक प्रसाधन गृह असावेत